# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२२ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

## आता चुहा बैठका

महापालिका निवडणुकीचा प्रचार थांबला. मतदानाला आणखी दोन दिवस आहेत. त्यामुळे सर्वच पक्षाचे नेते आता चुहा बैठकीवर भर देणार आहेत. या बैठकात खुल्लमखुल्ला प्रचार करता येत नसला, तरी घराघरात या बैठका होणार आहेत. या चुहा बैठकातूनच पुढील दिशा ठरविता येईल. प्रचारादरम्यान आपण कुठे कमी पडलो, कुठे पोहोचलो नाही, नाराज कोण यावर भर देण्यात येणार आहे. यंदाच्या निवडणुकीत प्रभागाची सीमा मोठ्या प्रमाणात वाढल्याने अनेकांना त्या प्रभागातील वस्त्यांमध्ये प्रचार करता आला नाही. ही खंत प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांना आहे. आता दोन दिवसात ही भरपाई भरून काढण्यावर नेते लक्ष देवून आहेत. त्यातही आपण कुठे कमी पडलो, मतदार नाराज का? यावरही या चुहा बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. नाराज कार्यकर्ते आणि मतदारांची समजूत कशी काढायची यावर देखील मंथन करण्यात येणार आहे. त्यासाठी काय करता येईल यावरही चर्चा होईल. मतदारांना कसे खुश करायचे. मतदारांना खुश करण्यासाठी कुणाला पाठवायचे. कोण या मतदारांना खुश करू शकेल यावर देखील चर्चा होणार आहे. एकंदरीत या दोन दिवसात चुहा बैठकींमध्ये निवडणुकीची पुढील रणनिती ठरणार आहे.

# सर्वच पक्षांच्या रॅलींनी शहर दुमदुमले

- मुख्यमंत्री फडणवीस, बावनकुळेंचा दुचाकीवरून
- प्रचार प्रचारतोफा थंडावल्या



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३**

भाजपसह सर्वच पक्षांच्या वतीने रॅली काढून महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची सांगता झाली. या रॅलींमुळे संपूर्ण शहर दुमदुमले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दुचाकीवरून प्रचार करीत मतदारांशी संवाद साधला. काही ठिकाणी दोन पक्षाचे उमेदवार आणि कार्यकर्ते समोरासमोर ठाकले. दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी समजुतदारपणाची भूमिका घेत ऐकमेकांना वाट मोकळी करून दिल्याचे शहरात दिसून येत होते.

मंगळवारी प्रचाराचा शेवटचा दिवस होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम प्रचाराला सुरूवात केली. सकाळी ११ च्या सुमारास तहसील हद्दीतील भारतमाता चौकातून ही रॅली काढण्यात आली. यावेळी फडणवीस यांच्यासोबत चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रवीण दटके, आशिष देशमुख, कृपाल तुमाने यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते. मध्य आणि पूर्व नागपुरातून ही रॅली फिरविण्यात आली. रॅलीच्या मार्गावर प्रत्येक चौकात प्रवेशद्वार उभारण्यात आले होते. फडणवीस यांची रॅली येताच मतदारांनी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. शहीद चौक, बडकस चौकमार्गे ही रॅली महाल येथील छत्रपती शिवाजी महाराजाच्या पुतळ्याजवळ आली. तेथे या रॅलीची सांगता करण्यात आली. फडणवीस यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्या पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या.

### खूप दिवसांनी दुचाकी चालविली

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, बऱ्याच दिवसानंतर दुचाकी चालवित आहे. त्यामुळे कसेतरी होत आहे. भाजपने नागपूरचा विकास केला. यंदाही नागपूरकर भरघोस मतदान करून मागील निवडणुकींचा विक्रम मोडीत काढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधकांनी कधीही विकास केला नाही. ती जबाबदारी आमच्यावर सोपवा असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

**धावपट्टू आमदार**

मुख्यमंत्र्यांची रॅली अत्यंत दाट वस्तीत आणि गल्लीबोळात असल्याने चारचाकी वाहनांना जाता येत नव्हते. त्यामुळे रॅलीच्या पुढे सुरक्षारक्षक आणि आमदार दटके, माजी आमदार गिरीश व्यास धावत होते. मुख्यमंत्र्याच्या मागे कार्यकर्त्यांची गर्दी होती. रॅलीदरम्यान, भारतमाता चौक ते गांधी गेटपर्यंतच्या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली होती.

**इतर पक्षांचाही रोड शो**

भाजपसोबतच कॉंग्रेस, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) आणि इतर लहानमोठ्या पक्षाच्या रॅली निघाल्या होत्या. कॉंग्रेसचे आमदार विकास ठाकरे, नितीन राऊत, अभिजीत वंजारी आणि इतर नेते आपआपल्या मतदारसंघात प्रचार करताना दिसून आले. काही प्रभागात दोन पक्षाच्या रॅली समोरासमोर आल्या होत्या. परंतु, कार्यकर्त्यांनी कसलाही वाद न करता ऐकमेकांना वाट मोकळी करून दिली होती.

# जि.प. आणि पं.स. निवडणुकीचा बिगुल वाजला

## आचारसंहिता लागू, राजकीय पक्ष अलर्ट

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३**

राज्यातील ग्रामीण सत्तेचा कौल ठरवणाऱ्या १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे रणशिंग आज फुंकले गेले. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान आणि ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार असल्याची अधिकृत घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केली. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित जिल्ह्यांत आदर्श आचारसंहिता तात्काळ लागू झाली असून, राजकीय हालचालींना वेग आला आहे.

सह्याद्री अतिथिगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना वाघमारे यांनी स्पष्ट केले की, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांमध्ये ही निवडणूक होणार आहे. जिल्हा परिषदांच्या ७३१ तर पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी ही थेट जनतेची लढत असणार आहे. त्यामुळे येत्या काही आठवड्यांत ग्रामीण भागात राजकीय वातावरण तापणार हे निश्चित आहे.

निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध होणार असून, १६ ते २१ जानेवारी या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार आहेत. नामनिर्देशनपत्रांची छाननी २२ जानेवारी, तर २७ जानेवारी रोजी उमेदवारी माघारी, निवडणूक चिन्हांचे वाटप आणि अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांसाठी ही डावपेचांची निर्णायक मुदत ठरणार आहे.

मतदान ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार असून, यासाठी राज्यभरात २५,४८२ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. निवडणूक यंत्रणेकडून पुरेशा प्रमाणात ईव्हीएमची व्यवस्था करण्यात आली असून, मतदान प्रक्रियेत कोणतीही कुचराई होऊ दिली जाणार नाही, असा संकेत आयोगाने दिला आहे.

# मराठा मोर्चाचा ठाकरे बंधूंना पाठिंबा



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३**

महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम अंतिम टप्प्यात पोहोचला असून, मतदान अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील राजकीय वातावरण कमालीचं तापलं असतानाच, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त सभेनंतर सत्तासमीकरणांना नवी दिशा मिळाल्याचं चित्र स्पष्ट होत आहे.

ठाकरे बंधूंच्या ऐतिहासिक सभेमुळे मुंबईत मोठी राजकीय हालचाल सुरू झाली असून, या सभेने कार्यकर्त्यांमध्ये नवे चैतन्य संचारले आहे. सभेनंतर भाजपकडून ठाकरे बंधूंवर जोरदार टीकेची झोड उठवण्यात आली असतानाच, आता मराठा मोर्चाने थेट ठाकरे बंधूंना जाहीर पाठिंबा दिल्याने राजकीय चर्चांना नवा आयाम प्राप्त झाला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मुंबईतील मराठा समाज ठाकरे बंधूंना मतदान करण्याचे आवाहन करणार असल्याची माहिती समोर आली आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रसिद्ध केलेल्या पोस्टरमुळे या भूमिकेवर शिक्कामोर्तब झाले आहे. या पोस्टरनंतर राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

मराठा मोर्चाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पोस्टरमध्ये, "मुंबई ही ठाकरे यांच्याच हातात शोभून दिसणार" असा ठळक आणि थेट राजकीय संदेश देण्यात आला आहे. या पोस्टरद्वारे मराठा समाजाचा उघड आणि आक्रमक पाठिंबा ठाकरे बंधूंना असल्याचं स्पष्टपणे दिसून येत आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या या आवाहनानंतर, मराठा मोर्चाने मुंबईत ठाकरे बंधूंच्या बाजूने कौल दिल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मराठा समाजाची भूमिका निर्णायक ठरणार का? याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

# महापालिका रणसंग्रामाच्या अंतिम क्षणात प्रचाराची अखेरची धडधड

**मुंबई, दि. १३**

घड्याळाचे काटे झपाट्याने पुढे सरकत आहेत प्रचाराच्या रणांगणातल्या शेवटच्या काही तासांत महाराष्ट्रातील २९ महापालिकांचे राजकारण अक्षरशः उफाळून आलं आहे. गेले १० ते १२ दिवस राज्यातील प्रत्येक शहर रस्त्यांपासून चौकांपर्यंत, गल्लीबोळांपासून व्यासपीठांपर्यंत राजकीय रणधुमाळीने भरलेलं होतं. उमेदवार, पक्षनेते, कार्यकर्ते आणि अपक्षसगळ्यांनीच पायाला भिंगरी बांधून प्रचाराचा अक्षरशः झंझावात निर्माण केला.

आज, मंगळवार (१३ जानेवारी) संध्याकाळी ५ वाजता प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. त्यामुळे या

### कोण कुठे ताकद आजमावणार?

शेवटच्या काही तासांत सभा, रोड शो, बाइक रॅली, प्रचारफेऱ्यासगळं काही एका क्षणात उरकण्याची घाई दिसून येत आहे. हे केवळ प्रचाराचे तास नाहीत, तर प्रतिष्ठेचा, सत्तेचा आणि पुढील राजकीय भविष्याचा फैसला करणारे क्षण आहेत.

या रणधुमाळीत सत्ताधारी आणि विरोधकदोन्ही बाजूंनी शब्दांचे घणाघात झाले. आरोपप्रत्यारोपांच्या फैरी झडल्या, आश्वासनांची मुक्त उधळण झाली. कोण "विकासाचा खरा वारस" तर कोण "शहराच्या नासाडीचा सूत्रधार"हे ठरवण्याची लढाई थेट मतदारांच्या दारात जाऊन लढली गेली.यंदाच्या प्रचारात पारंपरिक सभांसोबतच डिजिटल प्रचार, सोशल मीडिया व्हिडिओ, थेट संवाद आणि रोड शो यांचा जबरदस्त मारा झाला. मुंबई, नागपूर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगरया शहरांत तर प्रचाराचा सतत धगधगत असलेला तवा अनुभवायला मिळाला. कारण ही निवडणूक केवळ महापालिकांची नाही; ती राज्याच्या राजकारणाची नाडी तपासणारी ठरणार आहे.

नागपुरात थेट रस्त्यावर उतरून बाइक रॅलीइतवारी भारत माता चौक ते महालमधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा हा मार्ग स्वत: बाइक चालवत कापणार.




## मांजा वापराल तर अडीच लाखांचा दंड

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, प्रतिनिधी, दि.१२ जानेवारी

अलिकडे मकर संक्रांत सणाच्या निमित्तने मोठ्या प्रमाणावर पतंग उडवून सन साजरा करण्याची प्रथा रुढीस आली आहे. तेव्हा पतंग उडवितांना होणारा संभाव्य धोका लक्षात घेवून पोलिसांकडून जनजागृती केली जात आहे. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडून नायलॉन मांजा वापरा बाबत प्रतिबंध करण्यात आला आहे व नायलॉन मांजा वापर करणे, विक्री करणे bns कलम 223, पर्यावरण अधीनियम 15 प्रमाणे गुन्हा आहे तसेच 2.5 लाख पर्यंत दंड आहे, तेव्हा नागरिकांनी दक्षता घ्यावी, व पतंग उडविणे टाळावे, असे आवाहन अवधुतवाडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक काळे यांनी केले आहे.

## उपाध्यक्ष पदी दीपा सिंगी यांची बिनविरोध निवड



### दारव्हा नगरपरिषदेत वर्णी, सदस्यांची निवड

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दारव्हा, दि. १३ जानेवारी

दारव्हा नगरपरिषदेतील उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक च्या निवड मंगळवार, 13 जानेवारी रोजी पार पडल्या. या प्रक्रियेत शिवसेने व कॉंग्रेस पक्षाकडून सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. शिवसेनेकडून शहरप्रमुख राजू दुधे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कॉंग्रेसकडून मनोहर नवरंगे यांना स्वीकृत सदस्यपदी संधी देण्यात आली. तसेच उपनगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेचे दारव्हा तालुकाप्रमुख मनोज सिंगी यांच्या पत्नी दीपा सिंगी यांची निवड करण्यात आली. नियुक्तीनंतर शिवसेनेकडून नगरपरिषदेसमोर फटाके फोडण्यात आले. कॉंग्रेस पक्षाकडूनही त्यांच्या कार्यालयासमोर फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला. या नियुक्त्यांनंतर नगरपरिषदेचे कामकाज पुढील काळात सुरू राहणार असून, विविध समित्यांच्या सभापती पदांच्या नियुक्तीकडे शहराचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, दि. 13

: शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, व मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, (बी टी आर आय) यांच्या संयुक्त विद्यमाने संस्था, यवतमाळ येथे प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. दि.१९ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात येणार आहे. मेळाव्यामध्ये १० वी, १२ वी तसेच आय टी आय उत्तीर्ण उमेदवारांसाठी विविध व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवारीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये फिटर, टर्नर, वेल्डर, मशिनिस्ट, इलेक्ट्रीशियन, मोटार मेकॅनिक व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, मेकॅनिक ट्रॅक्टर, टूल ॲंड डायमेकर, पी.पी.ओ. व पेंटर जनरल, शीट मेटल तसेच इलेक्ट्रॉनिक्स या व्यवसायांचा समावेश आहे. उमेदवारांचे वय १४ ते ३५ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत उपस्थित राहावे,असे आवाहन संस्थेचे प्राचार्य व्ही. जे. नागोरे यांनी केले आहे.

### श्री गुरू तेग बहादूर यांचे 350 वे शहिदी समागम वर्ष

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, दि. 13

: 'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे. श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी कार्य करताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षा निमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने नागपूर व नवी मुंबई येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन झाले. आता जानेवारीमध्ये त २४ व २५ जानेवारीला नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचा मुंबई येथील कार्यशाळेने शुभारंभ करण्यात आला होता. श्री गुरू तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचविण्यात येणार आहे. तहसील, शहर जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात श्री गुरू तेग बहादूर यांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

# सत्तासंघर्षात बाजी कोण मारणार ?

## ढाणकी नगरपंचायतीत उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यासाठी आज निवडणूक

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १३ जानेवारी




ढा णकी नगरपंचायतीच्या सा र्वत्रिक निवडणुकीचा निकाल अन पेक्षित लागल्यानंतर, आता खऱ्या अर्थाने सत्तेचे समीकरण जुळवण्यासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. आज होणाऱ्या उपाध्यक्ष पदाच्या आणि स्वीकृत सदस्याच्या निवडीकडे संपूर्ण ढाणकीकरांचे लक्ष लागले असून, या निवडणुकीत भाजप विरुद्ध शिंदे सेना असा अटीतटीचा सामना रंगणार आहे.

नगरपंचायतीच्या 17 नगरसेवकांचे संख्याबळ पाहता, कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. सभागृहात सध्या खालीलप्रमाणे पक्षीय चित्र आहे: भाजप: ०७ नगरसेवक, अपक्ष: ० २ नगरसेवक, एम.आय. एम. (MIM): ०३ नगरसेवक शिंदे सेना (शिवसेना): ०३ न ग रसेवक, कॉंग्रेस: ०२ न ग र सेवक, उद्धव बाळासाहेब ठा क रे शिव सेना अर्चनाताई सुंदरकांत वासमवार (थेट जनतेतून निव डून आलेल्या नगराध्यक्षा), भाजपाने दोन अपक्ष नगरसेवकांना सोबत घेऊन ९ संख्याबळापर्यंत मजल मारली आहे. तर दुसरीकडे, स त्तेच्या चाव्या आपल्याकडे राखण्यासाठी मोठी राजकीय जुळवाजुळव होताना दिसत आहे. शिंदे सेनेचे ३, एम.आय.एम. चे ३, कॉंग्रेसचे २ आणि उद्धव ठाकरे गटाच्या नगराध्यक्षा अशा सर्वांची मोट बांधण्यात नगराध्यक्षा अ र्च नाताई वासमवार यशस्वी ठरल्याचे चित्र आहे.

सत्ते चा कार्यकाल स्थि र ठेवण्यासाठी ही 'म हाआघाडी' पद्धतशीरपणे वाटाघाटी करून बहुमताची जादूची छडी आपल्याकडे राखण्याचा प्रयत्न करत आहे. भाजप आणि विरोधातील आघाडी यांच्याकडे सध्या संख्याबळ जवळपास समसमान दिसत असल्यामुळे, उपाध्यक्ष पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. दोन्ही बाजूंकडून नगरसेवकांची जुळवाजुळव आणि 'फिल्डिंग' लावली जात असल्याने ही निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार आहे.

नगराध्यक्षा अर्चनाताई वासमवार या थेट जनतेतून निवडून आल्या असल्या तरी, सभागृहातील बहुमताचा आकडा गाठण्यासाठी त्यांना इतर पक्षांची साथ अनिवार्य आहे. या राजकीय पेचप्रसंगात आज दुपारी होणाऱ्या मतदानानंतरच ढाणकीचा 'उप'नगराध्यक्ष कोण असेल, याचा फैसला होणार आहे.

## डाक जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्त्यांची भरती

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

: भारतीय डाक विभागाच्या यवतमाळ विभागाअंतर्गत डाक जीवन विमा योजनेसाठी अभिकर्त्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. या पदासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार असून, मुलाखतीचे आयोजन दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत अधीक्षक डाकघर, यवतमाळ यांच्या कार्यालयात करण्यात येणार आहे. भरतीसाठी उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक असून, किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण किंवा समकक्ष आवश्यक आहे. उमेदवारांची निवड मुलाखतीतील कामगिरी, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व तसेच विमा क्षेत्रातील प्राथमिक ज्ञानाच्या आधारे केली जाणार आहे बेरोजगार किंवा स्वयंरोजगारातील युवक, माजी विमा सल्लागार, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका/मदतनीस, महिला मंडळ तसेच बचत गटांशी संबंधित महिलांना विशेष प्राधान्य दिला जाईल.

# उपनगराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच निलेश गावंडे जनतेच्या सेवेत

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १३ जानेवारी

शिवसेना शिंदे गटाचे उपनगराध्यक्ष निलेश रमेश गावंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नगरपरिषद कार्यालयात हजर राहून नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. जनतेसाठी तत्परतेने काम करण्याचा त्यांचा निर्धार यावेळी स्पष्टपणे दिसून आला.



"जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. शहरातील सर्वसामान्य नागरिक, गरिब, कष्टकरी व युवकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन नगरपरिषदेत प्रामाणिकपणे काम करणार आहे. आर्णी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सुविधा मजबूत करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. सर्व नगरसेवक, अधिकारी आणि नागरिकांच्या सहकार्याने आर्णीला अधिक सुंदर व विकसित शहर बनवण्याचा माझा संकल्प आहे."
**-निलेश रमेश गावंडे (उपनगराध्यक्ष, आर्णी)**

कमी वयातच दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून येण्याचा मान मिळवलेले निलेश गावंडे हे आर्णी शहरातील युवा नेतृत्वाचे एक ठळक उदाहरण मानले जात आहेत. नगरपरिषद निवडणुकीत बलाढ्य उमेदवार आणि मोठ्या आर्थिक ताकदीच्या विरोधात लढत असतानाही सर्वसामान्य व गरिब जनतेची भक्कम साथ त्यांना मिळाली आणि त्याच जनविश्वासाच्या बळावर त्यांनी विजय मिळवला. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी त्यांची कार्यपद्धती, सातत्यपूर्ण संपर्क आणि जनतेशी असलेला थेट संवाद यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी मोठा विश्वास निर्माण झाला आहे. पुढील काळातही ते जनहितासाठी प्रभावीपणे कार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमाला भेट



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १३ जानेवारी

महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी यवतमाळ च्या विद्यार्थ्यांनी उमरी पठार येथील संत दोला महाराज वृद्धाश्रमाला क्षेत्रभेट दिली. महाविद्यालयाच्या रा. से. यो तसेच समाजशास्त्र विभागाच्या वतीने प्रा. डॉ. स्वाती सरकटे व प्रा. पल्लवी वरकड यांनी या भेटीचे आयोजन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी तेथील वृद्धांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. महाविद्यालयाच्या वतीने वृद्धाश्रमाला बसण्याचे मॅटिन भेट देण्यात आले. त्याचप्रमाणे प्राध्यापकांनी सुद्धा मदत दिली. याप्रसंगी प्राचार्य आशिष होरे , प्रा. अंजली पाटील ,प्रा. प्रियांका नखाते अधीक्षक गजानन सामृतवार प्रा. अजंदरसिंग चावला प्रा. साक्षी मिर्झापुरे प्रा. अभिरुची शेजुळे प्रा.नरेंद्र पंडित प्रा. सुहास चौधरी प्रा. ओम पाळेकर, प्रज्वल गोरे प्रा. दिपाली शिंदे, प्रा. नरेंद्र इंगळे, प्रा. सोनल शिलारे, प्रा. खडकर, ग्रंथपाल नयन खोडे व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे संस्था अध्यक्ष लताताई महाजन व सचिव सदाशिवराव महाजन यांनी कौतुक केले आहे.

# स्वामी विवेकानंद स्मारकाचे यवतमाळात उद्घाटन

•युवाराष्ट्र दर्शन, प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १३ जानेवारी

देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी बायपास, यवतमाळ येथे स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून विदर्भातील राष्ट्रीय महामार्गावरील पहिले, 18 फूट उंच भव्य स्वामी विवेकानंद स्मारक अत्यंत भक्तिभावपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात उद्घाटन समारंभाद्वारे अनावरण करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्याचे उद्घाटन श्रीमत स्वामी विष्णुपादानंदजी महाराज प्रमुख, रामकृष्ण मिशन, छत्रपती संभाजी नगर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



या प्रसंगी श्रीमत स्वामी ओंकारेशानंदजी महाराज नागपूर, श्रीमत स्वामी चेतनात्मानंदजी महाराज गोंदिया तसेच डॉ. संदीप राठोड डायरेक्टर, क्रीडा व युवा मंत्रालय, भारत सरकार, डॉ. विकास मीना जिल्हाधिकारी, यवतमाळ, डॉ. टी. सी. राठोड, एल. एच. पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या ऐतिहासिक व प्रेरणादायी सोहळ्यास यवतमाळ जिल्ह्यातील हजारो नागरिक, युवक, विद्यार्थी व विवेकानंद प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मारक उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या देणगीदारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये धनंजय तांबेकर, विवेक कीनकर, राजूभाऊ निवल, दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रमोद बाविस्कर व मंगलाताई माळवी यांनी केले. या संपूर्ण स्मारक उभारणी व उद्घाटन सोहळ्यास "मेरा युवा भारत" या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत अनिल ढेंगे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्थेची संपूर्ण टीम, स्वामी विवेकानंद स्मारक समितीचे सर्व सदस्य, तसेच स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.राष्ट्रीय महामार्गावर उभे राहिलेले हे भव्य स्वामी विवेकानंद स्मारक युवकांना चारित्र्य, आत्मविश्वास, राष्ट्रनिष्ठा व सेवा भावनेची प्रेरणा देणारे विदर्भातील एक महत्त्वाचे प्रेरणास्थान ठरणार आहे.

# महागाव-गुंज रस्त्यावर पॅचवर्कचा 'महाघोटाळा'

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, महागाव, दि. १३ जानेवारी



महागाव ते गुंज दरम्यानचा डांबरी रस्ता सध्या अक्षरशः गलीतगात्र अवस्थेत असून या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. रस्ते विकासाचा दावा करणाऱ्या पुसद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्टाचाराचा कळस या मार्गावरील पॅचवर्कच्या कामातून समोर आला आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांवर तात्पुरत्या स्वरूपाची थिगळे लावून केवळ लिपापोती केली जात असून, 'रस्त्यात खड्डे आहेत की संपूर्ण रस्ताच खड्ड्यात आहे' असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे. हा रस्ता नव्याने आणि दर्जेदार पद्धतीने बांधण्याची नितांत गरज असताना, दरवर्षी पॅचवर्कच्या नावाखाली शासनाच्या कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे.

या मार्गावर अत्यंत सुमार दर्जाचे डांबर, गिट्टी व चुरी वापरून 'पैसा वाचवा, पैसा जिरवा' हा एककलमी कार्यक्रम राबविला जात असल्याचे उघड झाले आहे. प्रत्यक्ष कामाचा दर्जा पाहिल्यानंतर ठेकेदार आणि अभियंत्यांचे उघड संगनमत असल्याचे दिसून येते. गुंज ते फुलसावंगी या सुमारे २० किलोमीटर रस्त्याच्या डागडुजीसाठी तब्बल १ कोटी रुपयांचे पॅचवर्क कंत्राट मंजूर करून घेण्यात आले. यात ठराविक कंत्राटदारांना पोसण्यासाठी आणि स्वतःचे खिसे भरण्यासाठी हा सर्व घाट घातला गेल्याचा आरोप होत आहे. २०१९ पासून हा रस्ता प्रवासायोग्य राहिलेला नाही, परिणामी सर्व खाजगी वाहतूक महागाव-खडका-शिरपूर या पर्यायी मार्गाने वळवावी लागत आहे. वापरात नसलेल्या रस्त्यावर दरवर्षी पॅचेसच्या नावाखाली लाखो रुपये हडप करण्याचा धंदा सुरू असून या संपूर्ण 'गौडबंगालाची' उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी जोर धरत आहे. या संदर्भात शाखा अभियंता मयूर वंजारी यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, "या संदर्भात आम्ही सिमेंट कॉंक्रीट रस्ता करण्यासाठी वारंवार प्रस्ताव दिलेला आहे. तसेच विद्यमान आमदार किसन वानखेडे यांना सुद्धा प्रस्ताव पाठविला आहे, परंतु तो अद्याप प्रलंबित आहे."

शासकीय यंत्रणेच्या या दिरंगाईमुळे आणि निकृष्ट कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी लवकरच तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

### सीआरएफ फंडामधून नवीन रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव दाखल करण्यात येणार

**कलगाव ते गुंज रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जड वाहतूक सुरू असुन त्यामुळे रस्त्याची अवस्था नेहमीच खराब होत आहे.त्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिट च्या कामासाठी केंद्र सरकारच्या सीआरएफ निधीमधून मंजुरी मिळण्यात यावी याकरिता नव्याने प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.**

**:- मयुर वंजारी (प्रभारी उप अभियंता सा. बां.विभाग महागाव)**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी आर्णी यांचे न्यायालय आर्णी**

रामाक्र.०१ जन्म मृत्यु नोंद कलम १३(३)/२०२५-२६
मौजा शेकलगाव ता. आर्णी जि.यवतमाळ

**जाहीरनामा**

अर्जदार : संजय कैलास जाधव, रा. शेकलगाव, ता. आर्णी, जि. यवतमाळ
विरुध्द
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत शेकलगाव
बनाम :- सर्व नागरिक

ज्याअर्थी अर्जदार संजय कैलास जाधव, रा. शेकलगाव, ता. आर्णी.जि. यवतमाळ यांचा जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नुसार अर्जदार यांची मुलगी विद्या संजय जाधव हिच्या दिनांक २६/०१/२०११ रोजीच्या मौजा शेकलगाव येथील जन्माची नोंद ग्राम पंचायत शेकलगाव येथील जन्म मृत्यु नोंदणी अभिलेखात करण्याकरीता आदेश मिळणेबाबतचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे.
करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार विद्या संजय जाधव हिच्या दिनांक २६/०१/२०११ रोजीच्या मौजा शेकलगाव येथील जन्माची नोंद ग्रामपंचायत शेकलगाव येथील जन्म-मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत कुणाचा आक्षेप/ हरकती असल्यास जाहिरनामा प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुराव्याच्या दस्तऐवजासह वेळेत अर्ज सादर करावा, (शासकिय सुट्टीचे दिवस सोडुन) याद्वारे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणासही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जाची सुनावणी करण्यात येवुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**स्वाक्षरी**
**तहसिलदार आर्णी**

**जाहीर सुचना**

या द्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार जतिन दिपाली निखाडे अ.पा.क. तर्फे आई नामे दिपाली भास्करराव निखाडे रा. कळमेश्वर ता. कळमेश्वर जि. नागपूर यांचे वतीने कळविण्यात येते कि, जतिन दिपाली निखाडे यांचे कागदपत्रानुसार असलेले नाव दोषपूर्ण व चुकीचे असल्याने अश्या व्यक्तीचे नाव "जतिन राजेश डाखोळे" असे माननीय शासनाच्या राजपत्रामध्ये दि. १०-१६ जुलै २०२५ रोजी अधिघोषित झाले आहे. जतिन दिपाली निखाडे व जतिन राजेश डाखोळे या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. यापुढे आमचे पक्षकार पूर्वीचे नाव दुरुस्त करून शासन राजपत्रात आलेले नाव व्यवहारात प्रचलित करणार आहे.
सबब जाहीर कळविण्यात येत आहे.

**कळमेश्वर**
**दि. १४/०१/२०२६** **(ॲड. तुषार दिपक पुनसे)**

## नगरपरिषद कार्यालय, नेर नबाबपुर जि. यवतमाळ

क्रमांक/नपनेन/बांध. वि./ /२०२६
दिनांक :- / /२०२६

**प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील तज्ञ (CLTC) बाबत**
**जाहीर सूचना**

प्रधानमंत्री आवास योजना शहरी च्या यशस्वी अंमलबजावनी करिता नगर परिषद नेर नबाबपूर कार्यालयाच्या स्तरावर खालील प्रमाणे अस्थाई, तात्पुरते स्वरुपात कंत्राटी पद्धती द्वारे उमेदवाराची निवड करून कर्मचा-याची नियुक्ती करावयची आहे. तरी पात्रता धारक उमेदवारांनी दिनांक 20/01/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) आवश्यक सर्व कागदपत्रासह अर्ज स्वहस्ते/टपालाने विहित मुदतीत सादर करावा. कोणत्याही कारणाने व दिरंगाई मुळे मुदती नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. सदर जाहिराती बाबत सविस्तर माहिती संबंधित विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील तज्ञ (CLTC) स्थापत्य अभियंता | ०१ | 1) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी.<br>2) स्थापत्य अभियंता या पदावर किमान ३ वर्षांचा Procurement, design and supervision of Infrastructures works मधील अनुभव<br>3) किमान 1 वर्षाचा CLTC स्थापत्य अभियंता या पदाचा नगर परिषद/नगर पंचायत मधील अनुभव<br>4) किमान 6 महीने नगर परिषद/नगर पंचायत मधील कामाचा अनुभव |

ज्या उमेदवारांच्या अंतिम वर्षात SGPS/CGPA मध्ये गुण असतील त्यांनी SGPS/CGPA रुपांतर टक्केवारी मध्ये करण्याकरिता गुणांक वापरावा ते महाविद्यालयातून प्राप्त करून घ्यावे.
**टीप:**- सदर पदासाठी विहित नमुन्यातील अर्ज नेर नबाबपूर कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.
**अटी व शर्ती :-**
१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा त्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करावे.
२) जाहीराती मध्ये नमूद असलेले पद अस्थाई, तात्पुरते स्वरुपात व कंत्राटी नेमणूक असून या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
३) कंत्राटी पद्धतीवर निवड झालेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात व रकमेच्या स्टॅंप पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
४) उमेदवारास मुलाखतीकरिता स्वखर्चाने यावे लागेल व त्याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.
५) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिशाभूल केल्याचे अथवा बनावट कागदपत्र/प्रमाणपत्र/कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल.
६) निवड प्रकिया कोणत्याही टप्पावर कोणतेही कारण न दर्शविता सदर प्रकिया स्थगित रद्द अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी नगर परिषद नेर-नबाबपुर यांना राखून ठेवले आहेत.
७) उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर निवडीसंबंधी कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधीता अपात्र ठरविण्यात येईल

**स्वाक्षरी**
**मुख्याधिकारी**
**नगर परीषद नेर नबाबपूर**

14 Jane yuva- 26.qxd 1/13/2026 11:17 PM Page 1

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
बुधवार दि.१४ जानेवारी २०२६

## लाखनीत बॅगमध्ये सापडले नवजात बाळ



**युवाराष्ट्र दर्शन/ भंडारा** : लाखनी पोलिस ठाण्यांतर्गत पिंपळगाव सडक येथील शेतजमिनीला लागून एका बॅगमध्ये नवजात शिशु आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना आज दि.१३ रोजी उघडकीस आली.

मानेगाव सडक येथील शेतजमिनीला लागून असलेल्या झाडाजवळ एका काळ्या रंगाच्या बॅगमध्ये ८ ते १० दिवसांचे नवजात बाळ सापडले. या माहितीवरुन लाखनीचे पोलिस निरीक्षक सुभाष बारसे घटनास्थळी पोहोचले. बॅगची पाहणी केली असता त्यामध्ये एक स्त्री जातीचे नवजात बाळ दिसले. त्या बाळाला तात्काळ ग्रामीण रुग्णालय लाखनी येथे नेण्यात आले. तेथे उपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय भंडारा येथे दाखल करण्यात आले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# आज विदर्भाच्या काशीत अभ्यंग स्नानासाठी लोटणार जनसागर

- दुर्गाबाई डोह कुंभली येथील जत्रेला सुरूवात
- श्रीक्षेत्र चुलबंद नदी तीरावर ५ दिवस चालणार भव्य दिव्य जत्रा
- पोलीस प्रशासन सज्ज

**आशिष चेडगे / युवाराष्ट्र दर्शन**

**साकोली** : विदर्भच नव्हे, तर महाराष्ट्रासह छत्तीसगढ, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेशात प्रसिद्ध विदर्भाची काशी म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील साकोलीची कुंभली येथील भव्य दिव्य श्री दुर्गाबाई डोह जत्रेला आज १४ जानेवारी मकरसंक्रांतीच्या पावन पर्वावर श्री चुलबंद नदीवर अभ्यंग स्नान करण्यासाठी भक्तभाविकांचा जनसागर उसळणार आहे. सतत पाच दिवस चालणाऱ्या या विशालकाय जत्रेसाठी प्रशासनाने जय्यत तयारी करून ठेवली आहे. तर स्थानिक धर्मापुरी व कुंभली ग्रामपंचायत कमेटीने भक्तगण जनतेसाठी विशेष व्यवस्था केलेली आहे.







साकोलीपासून ३ कि.मी. वरील प्राचीन व ऐतिहासिक चुलबंद नदीच्या तीरावरील श्री दुर्गाबाई डोह जत्रा ही चौफेर प्रसिद्ध आहे. दरवर्षी मकरसंक्रांतीच्या पावन पर्वावर लाखोंच्या संख्येने भक्तभाविक येथे सकाळपासून अभ्यंग स्नान करीत श्री दुर्गा मातेची पुजा अर्चना करतात. पाच दिवस चालणाऱ्या या भव्य दिव्य जत्रेवर इतर राज्यांतील व भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर जिल्ह्यातील हजारो विविध दुकाने लागतात. या जत्रेत १४ व १५ जानेवारीला लाखोंच्या संख्येने अफाट जनसागर लोटणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ तर्फे "साकोली - कुंभली जत्रा" अश्या दोन दिवस बसफेऱ्या सुरू केल्या आहेत. जत्रेवर आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन व पोलीस विभाग बारकाईने लक्ष ठेवून आहेत. जत्रेमध्ये महिलांचे दागिने चोरणारे, पॉकीटमार अश्या भुरकट चोरांवर साकोली पोलीसांची करडी नजर राहणार आहे. जत्रा स्थळी साकोली उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापूरे, पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत वडूले व आशिष बोरकर, पोलीस नायक स्वप्नील गोस्वामी, चंद्रकांत थेर, शुभम घाटबांधे, पो. शिपाई वरकडे, सचिन कापगते, संदीप रोकडे, अनिफ राऊत, मडावी यांकडून पोलीस चौकीतून शांतता व सुव्यवस्था संचालन चालणार आहे. तर तहसिलदार निलेश कदम यांनी सुद्धा कर्मचाऱ्यांना सुचना देऊन यंत्रणा सज्ज केली आहे. साकोली चंद्रपूर महामार्गावरील वाहतूक व्यवस्था बघता जत्रा प्रवेशद्वारावर तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. येथे पोलीसांचे अतिरिक्त दल मागविण्यात आले आहे.

### जत्रेत काय विशेष?

परंपरागत चालत आलेली या श्री दुर्गाबाई डोह जत्रेवर भक्तभाविक जनतेसाठी विविध राज्यांतील नाविन्यपूर्ण व आकर्षक वस्तू विकायला येतात. येथे मुलांसाठी विविध आकाशपाळणे, मौत का कुआं, मिनी सर्कस, जादूचे प्रयोग आणि इतर मनोरंजक साधने आलेली आहेत. याचसोबत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रबोधन शिबीर, राजकीय पक्षातर्फे महाप्रसाद, विविध सामाजिक जनजागृती मंडप उभारली गेली आहेत. याचसोबत गावोगावांतून आलेल्या भक्तभाविकांनी तीन दिवस भोजन व्यवस्था व राहण्यासाठी अस्थायी तंबू सुद्धा उभारलेले आहेत.

### पोलीसांची करडी नजर

१४, १५ व १६ जानेवारीला तीन दिवस सुमारे लाखोंच्या संख्येने जनसागर लोटणार आहे. येथे गांजा, अंमली पदार्थ, अवैध दारू विकणायांवर तीक्ष्ण नजर असणार आहे. येथे जुगार, तीन पत्ती, झेंडी मुंडी, "दोरी फसवा डबल घ्या" सारखे जुगाराकडे साध्या पोषाखातील पोलीस चमु चाक्षाण नजर ठेवून आहेत. तर असे गुन्हेगारी पार्श्वभूमीतील अवैध धंदे जनतेला आढळल्यास तातडीने कुंभली जत्रा पोलीस चौकीत येऊन कळवा असे आवाहन साकोलीचे पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर, उपनिरीक्षक आशिष बोरकर व प्रशांत वडूले यांनी केले आहे.

## युवकांनी ग्राहक संरक्षण कायद्याचे महत्व समजून घ्यावे!

- जिल्हा पुरवठा अधिकारी नरेश वंजारी
- वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना केले पुरस्कृत

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा** : जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाच्या वतीने समाजिक न्याय भवन येथे ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत जिल्हयातुन ३० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अतिशय अभ्यासपूर्ण व प्रभावीपणे त्यांनी आपली मते मांडली.

परीक्षक म्हणून मंचावर ग्राहक पंचायतचे प्रांत अध्यक्ष श्री. नीतीन काकडे आणि प्रा. डॉ. शिरीष नखाते जे.एम. पटेल महाविद्यालय भंडारा यांची प्रमुख उपस्थिती होती, त्यांनी द्याव्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच श्री. संजय आयलवार व प्रा. अनिता महाजन अशासकिय सदस्य जिल्हा ग्राहक संरक्षण परीषद भंडारा हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरुन मार्गदर्शन करताना जिल्हा पुरवठा अधिकारी नरेश वंजारी यांनी स्वामी विवेकानंद यांची जयंती महणजेच राष्ट्रीय युवा दिना निमीत्त विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवुन त्यांच्यात नेतृत्व गुणांची वाढ व्हावी ,या दृष्टीकोणातून उत्कृष्ट वक्ता बनण्याची गरज असल्याचे सांगीतले.त्यांच्यामध्ये वकतृत्व कौशल्य निर्माण व्हावे या दृष्टीकोणातून ग्राहक संरक्षण कायदा २०१९ या विषयावर भाषण देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले .

खरेदी अधिकारी सुहास टोंग यांनीही बाजारपेठेत खरेदी करताना ग्राहकांनी सजग राहण ही काळाची गरज आहे .आपण दिलेला प्रत्येक रुपया आणि त्या बदल्यात मिळणारी सेवा यांचा ताळमेळ बसवण्यासाठी जागरूकता हवी, असे त्यांनी प्रतिपादन केले. व्यापाऱ्यांमध्ये व्यावसायिक नैतिकता असेल, तर ग्राहकांच्या शोषणाचा प्रश्नच उरणार नाही आणि अशा परिस्थितीत कायद्याची गरजही भासणार नाही."असे मत आभार प्रदर्शनात सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी रतनलाल ठाकरे यांनी मांडले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपिका अम्पूर्ण यांनी केले.

**स्पर्धेचा निकाल :**

**प्रथम क्रमांकः** कु. किमया घोडीचोर, महिला समाज महाविद्यालय भंडारा

**द्वितीय क्रमांकः** कु. माहेश्वरी तुमडाम, गांधी विद्यालय पहेला, जि. भंडारा

**तृतीय क्रमांकः** कोवीद देवतळे अनुराग कॉलेज वरठी जि. भंडारा

**चतुर्थ क्रमांकः** कु. मनस्वी नरेश टिचकूले पी. एम. श्री. कनिष्ठ महाविद्यालय लाखनी जि. भंडारा

सहभागी झालेल्या उर्वरित २६ विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देण्यात आले.

## मनरेगा बचावसाठी जिल्हा काँग्रेसतर्फे लाक्षणिक उपोषण

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही सन २००५ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंग जी यांच्या नेतृत्वाखाली शासनाने लागू केली होती मनरेगा योजने अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाला रोजगार देण्याची हमी देण्यात आली होती मागणी केल्यानंतर १५ दिवसामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याची जवाबदारी राज्य शासनाची होती. मनरेगा अंतर्गत दरवर्षी देशभरातील सुमारे ५ ते ६ कोटी कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येत होते.




मात्र केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना रद्द करून विकसित भारत गॅरंटी भार रोजगार अँड उपजीविकी मिशन ग्रामीण अधिनियम अमलात आणण्याचे ठरविले आहे. या नवीन कायद्यामुळे कामाच्या अधिकारांवर याप्रमाणे हमले केले आहे.

मनरेगा मध्ये १०० दिवसाची कामाची कोणतीही हमी नाही. मनरेगा मध्ये ग्रामसभेला अधिकार होते VBGRMG मध्ये शासनाकडून गांव निवडले जातील . मनरेगा मध्ये पूर्ण कामाची मागणी करता येत होते. या कायद्यात शासनाने निश्चित केलेल्या वेळेस काम मिळेल.

मनरेगा मध्ये मजदूरी ची गॅरंटी होती यामध्ये शासन आपल्या मजीर्ने करण्यात येईल. मनरेगा पंचायत अधिकार होते नवीन कायद्यात सरकार ठेकेदारा मार्फत काम करेल.

मनरेगा मध्ये १०० % खर्च केंद्र सरकार करत होते त्यामुळे राज्य सरकार बिनधास्त पणे कामे मंजूर करत होते. पण या नवीन कायद्यामध्ये केंद्र सरकारचे ६०% व राज्य शासनाचे ४०% खर्च करावा लागणार आहे.

या कायद्यात रोजगार सेवक सुद्धा रद्द होणार आहेत . या मनरेगा बचाव अभियानाच्या माध्यमातून कामाची गॅरंटी, मजदूरी ची गॅरंटी, कामाचा संविधानिक अधिकार व ४०० रुपये न्यूनतम मजुरी या मागणी करिता भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे करण्यात येत आहे तसेच यानंतर सुद्धा तालुका पातळीवर व ग्रामपंचायत स्तरावर अश्या प्रकारचे जन जागरण व आंदोलन करण्यात येणार आहेत.

यावेळी खासदार डॉ. प्रशांत पडोळे, जिल्हाध्यक्ष मोहनभाऊ पंचभाई, भंडारा तालुका अध्यक्ष प्यारेलाल वाघमारे, शहर अध्यक्ष धनराज साठवणे, नगर सेवक गजानन बादशाह, जिल्हा परिषद सदस्य अनिता भुरे,रिजवान काजी, सुभाष आजबले, देवाभाऊ इलमे, सुरेश ब्राम्हणकर, उत्तम भांगडकर, मनोज बागडे, जगदीश उईके, शंकरभाऊ तेलमासरे, मोहित मोहरकर, धर्मेंद्र नंदरधने, राजू निर्वाण, नरेंद्र वाघाये, भगवान नवघरे, भुमेश्वर महावाडे, क्रिष्णकांत बघेल, पृथ्वी तांडेकर, कान्हा बावनकर, अशोक कापगते, तुलशीदास बिलवने, गोविंद हुकरे, प्रमोद मानापुरे, अभिजित वंजारी, जगदीश ऊईके, बाळा ठाकुर, प्रमोद तितीरमारे, सुरेश मेश्राम, श्रावण लांजेवार, विपीन बोरकर, सेवक कोरे, हेमराज डोकरे, पुंडलीक पाऊलझगडे, सदानंद धारगावे, फारूक शेख, रवी तिरपुडे, विकास राऊत,लखन चौरे, अशोक कापगते, नवाब पटेल, नरेंद्र साकुरे व अन्य कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते

## चुलबंदच्या तिरावर आज भक्तीचा महाकुंभ!

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**लाखांदूर** : हिंदू संस्कृतीतील महत्त्वपूर्ण सण असलेल्या मकर संक्रांतीनिमित्त लाखांदूर तालुक्यातील दांडेगाव-मांढळ येथील पवित्र उत्तरवाहिनी पुण्यक्षेत्रावर भाविकांचा जनसागर उसळणार आहे. चुलबंद नदीच्या या दुर्मिळ प्रवाहामुळे या क्षेत्राला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले असून, यावर्षी देखील येथे भव्य यात्रा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता दिघोरी पोलीस विभागाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दांडेगाव-मांढळ येथे चुलबंद नदी उत्तरेकडून वाहत येऊन पुन्हा उत्तरेकडेच वळते. शास्त्रात अशा 'उत्तरवाहिनी' प्रवाहाला साक्षात गंगेचे स्वरूप मानले जाते. पुरातन काळापासून या ठिकाणी सूर्यस्नान आणि गंगास्नानाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत गेल्या ५० वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा जोपासली जात आहे.

मकर संक्रांतीला होणारी भाविकांची अलोट गर्दी आणि यात्रेचे स्वरूप पाहता, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिघोरी पोलीस विभागाने कंबर कसली आहे. यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी मंदिर परिसर, नदी घाट आणि वाहनतळ परिसरात विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस पथके सज्ज असून, वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

## अवैधरित्या वाळु वाहतुकीवर पोलिसांची कारवाई!

### वाळुसह दोन ट्रक ताब्यात

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर** : तालुक्यातील गोबरवाही पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या रोंघा-खाफा लेंडेझरी रोडवर दि.१३ जानेवारी पहाटे ४ वाजेदरम्यान पेट्रोलिंग करीत असताना पोलीस हवालदार मंगेश पेंदाम व सहकाऱ्यांना अवैधरित्या वाळूची वाहतूक करताना दोन ट्रक आढळले.



वाहनाला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये विनापरवाना वाळू आढळून आल्याने विचारपूस केल्यावर त्यांच्याकडे कोणतेही परवाने नसल्याने आरोपी भुषण देविदास भुरे व अश्विन हरिश्चंद्र भोवते दोन्ही रा. कामठी यांना ताब्यात घेऊन दोन्ही ट्रक अंदाजे किंमत ८० लाख व वाळु १२ ब्रास किंमत ६० हजार रु. असा एकूण ८० लाख ६० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्यावर जमीन महसूल अधिनियम व कलम ३०३(२, ३) अंतर्गत गुन्हा नोंद करून ठाणेदार शरद शेवाळे यांच्या मार्गदर्शनात कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती गीते व हवालदार राघोर्ते करीत आहे. मागील तीन दिवसापूर्वी लोभी व डोंगरी येथील व्यावसायिकावर ईडीची धाड पडली होती. त्यामुळे पोलिसांनी वाळू माफीयावर आपला फास आवळला आहे.

## ग्रामीण भागातील विकासासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे

### दिशा समितीच्या बैठकीत खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांचे आवाहन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा** : ग्रामीण भागातील विकास प्रामुख्याने करण्यासाठी केंद्र शासनाच्या ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या योजनांचे परिचालन दिशा योजनेमधून दिशा समितीच्या माध्यमातून होते. ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी समन्वयाने व प्रयत्नपूर्वक काम करावे, असे निर्देश खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी आज दिले.



जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात संपन्न झालेल्या या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष कविता उईके, आमदार राजू कारेमोरे, जिल्हाधिकारी सावन कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद कुमार साळवे, उपवनसंरक्षक योगेंद्र सिंह, अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्यासह दिशा समितीचे सदस्य उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला मागील बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन व त्यावर झालेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये आमदार राजू कारेमोरे तसेच अन्य सदस्यांनी सहभाग घेतला.

सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत लाभार्थ्यांना होणाऱ्या पेटी वाटपामध्ये गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने सॉफ्टवेअर अपग्रेडेशन सुरू असल्याची माहिती कामगार विभागाने दिली. गेल्या बैठकीस अनुपस्थित असलेल्या विभागप्रमुखांकडून प्राप्त खुलासे यावेळी खासदार महोदयांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आढावा व सुरू असलेल्या कामांची माहिती विचारली असता, जिल्ह्यात सध्या ३ लाख ३० हजार २३६ सक्रिय मजूर असून ३ लाख ११ हजार ६०४ जॉब कार्ड निर्गमित झाल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) यांनी दिली.

जिल्ह्यात दर्जेदार खेळाडू निर्माण होण्यासाठी 'खेलो इंडिया' योजनेअंतर्गत क्रीडांगण विकासाचा तसेच गुणवंत खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश श्री. पडोळे यांनी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना दिले.

मुख्यमंत्री रोजगार योजना, प्रधानमंत्री रोजगार योजना तसेच मुद्रा योजनेअंतर्गत किती बेरोजगारांनी लाभ घेऊन स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत, याबाबत यशोगाथा प्रसिद्ध करण्याचे निर्देश खासदारांनी दिले. जल जीवन मिशनबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर स्वतंत्र आढावा बैठक घ्यावी, असे निर्देशही डॉ. पडोळे यांनी दिले.

जल जीवन मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या रिचार्ज शाफ्ट उपाययोजनांचा पुनरुज्जीवन आढावा, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास घटक), मध्यान्ह भोजन योजना, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, प्राथमिक शिक्षण विभागाच्या योजना तसेच समग्र शिक्षा अभियान (जिल्हा परिषद, भंडारा) यांच्या कामांचा आढावा खासदार महोदयांनी घेतला.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत जिल्ह्यात एकूण ९६ हजार ३१८ गॅस कनेक्शन वितरित करण्यात आल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली.

घरकुल योजनेच्या प्रगतीचा आढावाही डॉ. पडोळे यांनी घेतला. तसेच राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात महसूल व भूमी अभिलेख विभागाकडील अभिलेखांचे स्कॅनिंग काम पूर्ण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीचे संचलन प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा विवेक बोंद्रे यांनी केले.

साकोली क्षेत्रातील सर्व भक्तभाविक जनतेला
मकरसंक्रांती निमित्त हार्दिक शुभेच्छा

कामधेनू पशु आहार
ऑल एनिमल फुड सेंटर
स्टॉप इन हॉटेल बाजूला, मेन रोड साकोली - 441802
संपूर्ण पशु प्राण्यांचे खाद्य पदार्थ विक्रेता
तथा मत्स्य आहार केंद्र
प्रो. ग्यानीराम गोबाडे फोन - 9422830519

लक्ष्मी ट्रेडर्स
TATA TISCON
स्टेट बँक समोर, मेन रोड साकोली - 441802
एशियन पेन्ट, बिरला A-1 सिमेंट, बिरला व्हाईट
फॅशन व्हाईट, स्नोसेम प्लस, टाटा टिस्कॉन
प्रो. अरूण परसरामजी गुप्ता फोन - 9422236634

कनक फॅशन ज्वेलरी & एजन्सी
पोस्ट ऑफिस बाजुला, भुमि अभिलेख कार्यालय समोर, सिव्हिल वार्ड साकोली - ४४१८०२
फुड, कॉस्मेटिक, फॅशन ज्वेलरी एजन्सी
प्रो. आशिष महेश गुप्ता फोन - 9284898444

हुकमतमल गेलामल
किराणा मर्चंट साकोली
आठवडी बाजार चौक,
मेन रोड साकोली, जिल्हा भंडारा
अनिल प्रतापजी चुघ अमर प्रतापजी चुघ

भाऊचा ढाबा
इंडियन पेट्रोल पंप जवळ, नॅशनल हायवे नं. 6
मुंडीपार / सडक, तह. साकोली. जि. भंडारा
प्रो. गिरीश रहांगडाले फोन - 7972083657

संग्राम गार्ड सिक्युरिटी प्रा. लिमि. नागपूर
सुरक्षा रक्षक प्रदानाची एकमेव कंपनी
सिक्युरिटी स्टाफ भरती सुरू आहे
संचालक - सुशिल रंगारी संपर्क फोन - 9823103757

सर्व जनतेला मकरसंक्रांती निमित्त हार्दिक शुभेच्छा
कुंभली श्री दुर्गादेवी डोह जत्रेत येणाऱ्या सर्व
भक्तभाविक जनतेचे धर्मापुरी येथे हार्दिक स्वागत
ग्रामपंचायत कार्यालय
धर्मापुरी - गडकुंभली, ता. साकोली. जिल्हा भंडारा

सर्व जनतेला मकरसंक्रांती निमित्त हार्दिक शुभेच्छा
कुंभली श्री दुर्गादेवी डोह जत्रेत येणाऱ्या सर्व
भक्तभाविक जनतेचे कुंभली येथे हार्दिक स्वागत
ग्रामपंचायत कार्यालय कुंभली
तथा सर्व ग्रामपंचायत कमेटी
ता. साकोली. जिल्हा भंडारा

श्री गणेश जाळी उद्योग
व i Jal आर ओ वॉटर
मेन रोड धर्मापुरी / कुंभली
सर्व प्रकारच्या जाळी बनवून मिळतात
9767121767 7620034692

श्री राईस मिल
कुंभली / धर्मापुरी
कडून
सर्व भक्तभाविक जनतेला
मकरसंक्रांतीच्या हार्दिक मंगलमय शुभेच्छा
शुभेच्छुक - सौ. सुनिता नितााराम भेंडारकर, कुंभली

जाहिरात संकलन - आशिष चेडगे युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी साकोली - 8605699863

# सहा महिन्यापासून एक दिवसाआड गढूळ पाणी पुरवठा

❒ घाण पाणी वाहून जाणाऱ्या नाल्या तुंबल्या, ❒ घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया झाली रामभरोसे



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी(श)दि,१३**

नगर पंचायतच्या हद्दीतील सर्व प्रभागात गेल्या सहा महिन्यापासून एक दिवसा आड गढूळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असून सांडपाणी वाहून जाणाऱ्या नाल्या उपसल्या नसल्याने शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तर घन कचरा वाहून नेणाऱ्या घंटा गाड्या बंद झाल्याने आष्टी शहरातील प्रत्येक वार्डात दुर्गंधी पसरली असून डास, मछर चे प्रमाण वाढतीवर असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सविस्तर असे की,आष्टी शहरातील घाण पाणी वाहून नेणाऱ्या नाल्या उपसल्या नसल्याने नाल्या बुजून चोकअप झाल्या, नाल्या चोक अप झाल्यावर त्या उपसन्यकारिता नगर पंचायत विभागाने कोणतीही उपाय योजना केली नाहीं. तर दुसरीकडे घन कचरा व्यवस्थापन करणारी यंत्रणा चा कार्यभार मनमानी सुरु आहे. गेल्या सहा महिन्यापासून घन कचरा व्यवस्थापण करणाऱ्या यंत्रनेने पैसे उपलब्ध नाहीं हे कारण समोर करून घंटा गाड्या बंद केल्या.

तर काही प्रभागात कचरा उचलण्याकरिता गाड्या फिरवल्या जातात मात्र त्या वाहणात कचरा टाकण्यात मनाई करण्यात येते.

## घन कचरा व्यवस्थापन प्रक्रिया रखडली

आष्टी नगर पंचायतला १५व्या वित्त आयोगातून २९लाख रुपये प्राप्त झाले आहे. कामाचे नियोजन नसल्याने घन कचरा व्यवस्थापन प्रक्रिया रखडली आहे. मुख्य टाकी बंद केल्यामुळे आष्टी शहरात पिण्याच्या पाण्याची समस्या आता पाचवीला पूजली आहे. नगर पंचायत अधिकारी वं पदाधिकारी यांच्या मनमानीमुळे एक दिवसा आड पाणी पिण्याची वेळ आली आहे.

**मनिष ठोंबरे, नगरसेवक आष्टी नगर पंचायत**

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

शहरातील मेन मार्केट, आठवडी बाजार, बस स्टॅन्ड परिसरात जागोजागी कचऱ्याचे ढीग नजरेस पडते. दुसरीकडे आष्टी शहरात गेल्या सहा महिन्यापासून नागरिकांना स्वछ पिण्याचे पाणी मिळत नाहीं. याउलट एक दिवसाआड नळ येत असून त्यात गढूळ पाणी येत असल्यामुळे पिण्यास योग्य नाहीं. असे असले तरी आष्टी नगर पंचायत मुख्य अधिकारी नगराध्यक्ष गप्प आहे. पाणी पुरवठा विभागातील अभियंता नरपाचे हा नगर पंचायत कार्यालयात राहत नसून गैरहजर असतो. समस्या असल्यास फोन केल्यावर फोनला प्रतिसाद देत नाहीं. नगर पंचायत चे मुख्य अधिकारी व नगराध्यक्ष यांना नागरिकांच्या समस्याचे निराकरण करता येत नसल्याने शहरातील नागरिकांत नगर पंचायत प्रशासनाप्रती नाराजीचा सूर आहे. शहरातील सर्व समस्या आ वासून उभ्या असल्यामुळे आष्टी वासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# युवकांचा विकास हाच देशाचा विकास : प्रा भूषण तुरनकर




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू,दि.१३**

युवकांची शक्ती ही परिवर्तनाची ऊर्जा, युवकांच्या विकास म्हणजे देशाचा विकास आहे. आपल्या विचारात सकारात्मकता ठेवली तर तो युवक हा स्वतः आपले ध्येय साध्य करण्यासाठी स्वतःमध्ये परिवर्तन करून आपले उद्देश साध्य करू शकतो. युवकांनी आव्हाने स्वीकारून त्यांना आपले स्वप्न साकार करण्यास एकनिष्ठ असणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रमुख वक्ते प्रा. भूषण तुरनकर यांनी केले. स्थानिक यशवंत महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वामी विवेकानंद जयंती च्या निमित्त राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

कार्यकमाचे अध्यक्षस्थान डॉ अनंत रिंढे यांनी भूषविले. कार्यक्रम अधिकारी डॉ अर्चना फाळके, प्रा.सोनाली ठाकरे, पियुष कपाटे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनंत रिंढे यांनी मार्गदर्शनात सिंधखेड राजाच्या मातीत जन्मलेल्या कर्तुत्ववान माउली ज्यांनी शिवबासारखा महापराक्रमी पुत्र घडवला आणि शून्यातून स्वराज्य निर्माण करण्याची जिद्द दिली. युवकांना जबाबदारीची जाणीव करत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ .अर्चना फाळके यांनी प्रास्ताविक केले .कार्यक्रमाचे संचालन मिताली तितरमारे तर आभार भूमिका सिरसाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर मार्गदर्शन लाभले.

# हद्दपार आरोपीस घेतले ताब्यात

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १३**

जिल्हयातून दोन वर्षासाठी हददपार असलेल्या आरोपीला पोलिसांनी त्यांच्या घरुन अटक केली, ही कारवाई रविवारी देवळी पोलिसांनी केली, सूरज उर्फ अडकिता बाबाराव नलोडे (२४ रा. काळा पुलाजवळ, देवळी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे, आरोपीविरुद्ध देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला.

# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता

## बचत गटांकडून मिनी ट्रॅक्टरसाठी अर्ज आमंत्रित

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा दि. १३**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने जसे कल्टीवेटर किंवा रोटावेटर व ट्रेलर यांचा पुरवठा करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांकडून २० जानेवारी पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा बचतगट शासकीय यंत्रणेकडून नोंदणीकृत असावा. तसेच बचतगटाच्या नावे बँक खाते असावे आणि बँक खात्यासोबत आधार कार्ड क्रमांक संलग्न असावा. त्याबाबतची झेरॉक्स प्रत सादर करावी. बचतगटामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे किमान ८० टक्के सदस्य असावे व सर्व सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावे. जात प्रमाणपत्र, राशन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र इत्यादी पुरावा अर्जासोबत जोडावे. गटातील अध्यक्ष व सचिव अनुसूचित जाती व नवबौध्द समूहातील असावे. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदीची कमाल मर्यादा रुपये ३ लक्ष ५० हजार इतकी राहील. यामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांचा कमाल मर्यादेच्या १० टक्के स्वहिस्सा असेल. या व्यतिरिक्त स्वयंसहाय्यता बचत गटास ट्रेलर व ट्रॅक्टर यांच्या आरटीओ कार्यालयातील नोंदणीचा खर्च व तसेच स्थानिक जकात कर (लागू असल्यास) स्वत: बचत गटांना भरावा लागेल. सदस्यांची तपशिलवार यादी तसेच मिनी ट्रॅक्टर खरेदी बाबतचा ठराव अर्जासोबत सादर करावा. यापुर्वी सदर योजनेचा व पावर टिलर योजनेचा लाभ बचत गटाने घेतला नसल्याचे शपथपत्र सादर करावे,

अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांनी केले आहे.

# हिंगणघाटमध्ये दुचाकीसह गांजा केला जप्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १३**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हिंगणघाट येथील महात्मा फुले वॉर्डमध्ये एका घरी छापा टाकून ७२१ ग्रॅम गांजासह एक दुचाकी असा एकुण १ लाख १४ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, तसेच आरोपीला अटक करुन एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला,

शैलेंद्र उर्फ डोमा सुरेश दादाले रा. महात्मा फुले वॉर्ड असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे, हा घरातून गांजाची विक्री करीत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा टाकून ७२१ ग्रॅम गांजा आणि एम. एच. ३२, ए. झेड. ८३५२ क्रमांकाची दुचाकी जप्त केली, त्यांनी हा गांजा वर्ध्यातील इतवारा परिसरातील विकत घेतल्याचे सांगितले, ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या निर्देशानुसार स्थाानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक सलाम कुरेशी, अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवी पुरोहित, अभिषेक नाईक यांनी केली. .

# दोन दुचाकीच्या अपघातात दोघे जखमी

**वर्धा, :**दोन दुचाकीच्या अपघातात दोन जण जखमी झालेत, ही घटना १० जानेवारी रोजी न्यू रेल्वे कॉलनी रोडवर घडली, जखमीची नावे अनिल टिकाराम आस्कर, दिगांबर भाऊराव लाकडे अशी आहेत, याप्रकरणी तक्रारीवरुन रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, पोलिसांचा पुढील तपास सुरु आहे.

# शिवसेना महिला आघाडीच्यावतीने जिजाऊ जयंती साजरी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा ,दि.१३**

स्थानिक शिवसेनेच्या विभागीय कार्यालयात राजमाता जिजाऊ यांची ४२८ वी जयंती शिवसेना प्रणित महिला आघाडीच्यावतीने साजरी करण्यात आली.

महिला आघाडीच्या शहर प्रमुख मयुरी गांधी यांच्या नेतृत्वात आयोजित कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती महिला आघाडी जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर यांची होती.

यावेळी जिल्हा प्रमुख शुभांगी ठमेकर यांच्या हस्ते स्वराज्य जननी राजमाता जिजाऊच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष करत जय भवानी जय शिवाजीच्या गजरात राजमाता जिजाऊ यांची जयंती कार्यक्रम पार पडला. यावेळी महिला आघाडी शहर प्रमुख मयुरी गांधी यांच्यासह उपस्थित महिलांनी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

कार्यक्रमात स्नेहा काचलिया, लक्ष्मी भुंबर, कविता घवघवे,सुनीता शुक्ला, रमा शुक्ला,प्रभाग प्रमुख लिना जमणारे,सीमा कोटनाके, अगस्ता शेंडे,धनश्री थोरात, विद्या कोसूरकर,मिलन गांधी,विनोद जमणारे, धरम शेंडे,लक्ष्मण कोटनाके यांची उपस्थिती होती.

# नेत्रहीन, दिव्यांग बांधवांना आत्मसन्मानाचा मार्ग दाखविणे गरजेचे -अग्रवाल

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १३**

आयुष्यात येणार चढ-उतार ही एक दैवी योजना असल्याचे जरी आपण गृहीत धरले तरी काही व्यक्तींना त्यांच आयुष्य दृष्टीहीन आणि पुर्णत्व अंधकारमय जगण्याचे नशीबी येते तेव्हा या विश्व निर्माता विधात्याने केलेले दुजाभाव साऱ्यानांच क्लेशदायक ठरतो. नेत्रहीन, दिव्यांग बांधवांना आत्मसन्मानाचा मार्ग दाखविणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवी मोहन अग्रवाल यांनी केले.

संत गजानन महाराज देवस्थानच्या सभागृहात ऑल ईंडिया शास्त्री सोशल फोरम व स्व. गायत्री देवी अग्रवाल सेवा संस्था व्दारा आयोजित स्नेह मिलन तथा नेत्रहीन, दिव्यांग बांधवांना जिवनोपयोगी साहित्य वितरण सोहळ्या प्रसंगी कार्यक्रमाचे



अध्यक्ष म्हणून बोलत होते.कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अनिलकुमार दक्ष यांनी केले, तर प्रमुख अथिती म्हणून इमरान राही, किरण फुलझेले, प्रबोधनकार मयूर महाराज दरणे, उप-कार्यकारी अभियंता अमोल आठवले, सत्यआश्रम मंडळाचे अध्यक्ष विजय सत्यम, चेतनअग्रवाल, नाना पहाडे, मधू अग्रवाल, उल्हास वाघ, राजु लभाणे, जिल्हाधक्ष संतोष तूरक, डॉ. हेलन केअर अंध व अपंग संस्थेचे सचिव प्रकाश सिंग बावरी, दिव्यांग वेलफेअर फांऊडेशनचे उपाध्यक्ष भिमराव वाघ, शरद कठाणे, संजय मिश्रा, अब्दुल गणी मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन हरीष तांदळे यांनी केले आभार महेश अग्रवाल यांनी मानले. या प्रसंगी १०० नेत्रहीन व दिव्यांग बांधवाना भोजनदान व ब्लॅंकेट वितरण करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करयाकरिता, वेदांत चौधरी, दिनेश अग्रवाल, विक्रांत गव्हाने, अँड इब्राहीम बख्श, एहसान राही, साहिल वाघ, सुनिल पाटिल, दिपक अग्रवाल आदीनी अथक परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### प्रल्हाद लाडविकर



**वर्धा :** तळेगाव शा. पंत, येथील रहिवासी प्रल्हाद लाडविकर वय (७६) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांचे पार्थिवावर हिंदू स्मशानभूमीत अंत्य संस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चत एक मुलगा, सून,तीन मुली,जावई, नातवंड असा आप्तपरिवार आहे.

# हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई


**वर्धा, :** हद्दपाराच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई केली, याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, देवळी येथील सुरज उर्फ उघडकीस बाबाराव नलोडे (वय २४) यास दोन वर्षाकरिता हद्दपार करण्यात आले, पण, तो कोणाचीही परवानगी न घेता घरी वावरताना आढळला, पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला,

पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त श्रमदान कार्यक्रम

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१३**



'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे सन २०२५-२६ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असून, या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन व गुरु नानक नाम सेवा संगत (सिख, सिकलकार, बंजारा, लबाना, सिंधी व मोहियाल) तसेच इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथील मोदी ग्राउंड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या कालावधीत सदर ठिकाणी दरबार साहिब असणार असल्याने भाविकांना कार्यक्रमस्थळी अनवाणी प्रवेश करावा लागणार आहे.

त्यामुळे भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, परिसर स्वच्छ व सुस्थितीत राहावा, यासाठी दि. १३ व १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता विशेष श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा श्रमदान उपक्रम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत नांदेड शहरातील विविध शाळांतील विद्यार्थी, सामाजिक संस्था व स्वयंसेवकांच्या सहभागातून राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून सेवाभाव, सामाजिक एकात्मता व स्वच्छतेचा संदेश देण्यात येणार आहे.

# वचपा काढण्यासाठी दुचाकींना केले आगीच्या हवाली

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१३**

माहेरी परतलेल्या पत्नीच्या ताब्यातील मुलांना घेण्यासाठी आलेल्याने वादाचा वचपा काढण्यासाठी चक्क घराच्या आवारात असलेल्या दुचाकींना आगीच्या हवाली केले. ही घटना ११ रोजी जुना पुलगाव परिसरात घडली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी तक्रारीवरून दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहे.जुना पुलगाव येथील रहिवासी बहादुरसिंग खुनसिंग बावरी यांच्या मोठ्या वडिलांची मुलगी सिमरन ही पतीशी घरगुती कारणामुळे वाद झाल्याने पुलगाव येथे माहेरी परतली.

१० जानेवारीला सिमरनचा पती लक्ष्मणसिंग भादा व सिकंदरसिंग भादा दोन्ही रा. आर्वी हे पुलगावला आले. लक्ष्मणसिंग भादा याने पत्नीला तु तुझ्या वडिलांकडेच रहा, पण मला माझ्या मुलांना घेवून जाऊ दे असे सांगितले. संबंधित चर्चे दरम्यान सिमरनच्या वडिलांनी मध्यस्ती करून वाद निवळविण्याचा प्रयत्न केला. पण लक्ष्मणसिंग भादा व सिकंदसिंग भादा हे दोघेही शिवीगाळ करीत तेथून निघून गेले. त्यानंतर मध्यरात्री घराच्या आवारातील श्वान जोराजोराने भुंकत असल्याचे लक्षात आल्याने बहादुरसिंग बावरी हे जागे झाले. त्यांनी घराबाहेर येत पाहणी केली असता त्यांच्या घराच्या आवारातील दोन दुचाकी जळत होत्या. शिवाय लक्ष्मणसिंग भादा व सिकंदरसिंग भादा हे तेथून पळताना दिले.

# हुतात्मा स्कूलच्या प्रतिकृतीची राज्यस्तरावर निवड




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी(श),दि.१३**

जे. बी. सायन्स कॉलेज येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय ५३ व्या विज्ञान प्रदर्शनात हुतात्मा राष्ट्रीय इंग्लिश मीडियम स्कूल येथील माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शाळेचे विद्यार्थी नैतिक संजय भार्गव व श्रेया नरेश भार्गव यांनी सादर केलेल्या 'इंटिग्रेटेड इको स्मार्ट सिटी' या नाविन्यपूर्ण प्रतिकृतीला जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळून राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. पर्यावरणपूरक विकास, आधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत जीवनशैली यांचा उत्कृष्ट समन्वय या प्रतिकृतीत साकारण्यात आला असून परीक्षकांनी त्याचे विशेष कौतुक केले. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राहुल श्रीधर ठाकरे, सचिव विनायक होले, उपाध्यक्ष डॉ. किशोर गंजीवाले, सहसचिव भरत वंजारा, कोषाध्यक्ष शंकर नागपुरे, राजाभाऊ सव्वालाखे तसेच अर्पित मालपे यांनी विद्यार्थ्यांचे केले. शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा ढोले यांच्या मार्गदर्शनात मार्गदर्शक शिक्षक चेतन वानखडे, उमेश मख व जया कोहळे तसेच विद्यार्थ्यांचे पालक यांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याचे नमूद करण्यात आले.

